महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक :** 1442/गट-क संयुक्त-क.स /2023/24 **बैठक क्रमांक :** **दिनांक :** 12 मार्च, 2025

**प्रति ,**

**KODAG SNEHA SHIVAJI (3511112023311023O126166)**

**विषय :- महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा - 2023 (जाहिरात क्रमांक - 111/2023) कर सहायक,गट-क, वित्त विभाग या पदी शिफारशीबाबत**

महोदय /महोदया,

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस असे कळविण्यात येते की, दिनांक 05 मार्च, 2025 रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या अंतिम निकालानुसार 'महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा - 2023' मधून आपली 'कर सहायक, गट-क' या पदावरील नियुक्तीकरिता 'सचिव, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, विक्रीकर प्रशासन-1, मंत्रालय, मुंबई - 400 032 ' यांचेकडे शिफारस करण्यात येत आहे.

2. प्रस्तुत परीक्षेच्या अंतिम निकालाच्याआधारे आपण अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने आपली मूळ प्रमाणपत्रे नियुक्तीपूर्वी शासन स्तरावर तपासण्याच्या अधीन राहून शिफारस करण्यात येत आहे. आपली पात्रता, शैक्षणिक व टंकलेखन अर्हता, वयोमर्यादा, नॉन-क्रिमीलेयर (NCL) प्रमाणपत्र तसेच सामाजिक व समांतर आरक्षण तसेच दिव्यांगत्वविषयक दावे इ. (लागू असेल त्याप्रमाणे) आपल्या मूळ प्रमाणपत्रांधारे नियुक्तीपूर्वी शासनाच्या विहित/सक्षम प्राधिकाऱ्यांकडून तपासून पात्र ठरल्यासच आपणास विषयांकित पदावर नियुक्ती देण्यात येईल.

3. प्रस्तुत परीक्षेचा अंतिम निकाल मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण व मा.उच्च न्यायालय येथे दाखल करण्यात आलेल्या विविध मूळ अर्ज/रिट याचिका प्रकरणी होणाऱ्या अंतिम निकालांच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

4. प्रस्तुत परीक्षेच्या अर्जात नमूद केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने आपली पात्रता मूळ प्रमाणपत्रांवरून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून आपली शासनाकडे शिफारस करण्यात येत असल्याने आपण आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता न केल्यास, शासनस्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार मूळ कागदपत्रांच्या आधारे दावे तपासताना व अन्य कारणांमुळे अपात्र ठरल्यास आपली उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

5. अर्जामध्ये खोटे/चुकीचे दावे करणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. यासंदर्भात आपले लक्ष आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांच्या सर्वसाधारण सूचना व आपण सदर परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील प्रतिज्ञापत्राकडे वेधण्यात येत आहे.

6. साक्षांकन नमुना आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर साक्षांकन नमुना डाऊनलोड (Download) करुन घेण्यात यावा व संपूर्ण भरुन नियुक्ती देण्यात आलेल्या शासनाच्या संबंधित विभागास/कार्यालयास परस्पर सादर करावा. साक्षांकन नमुन्यातील रकाना क्रमांक 11 मध्ये अटक, शिक्षा, दंड व इतर कारवाई झाली असल्याबद्दलची माहिती "होय" किंवा "नाही" या उत्तराने भरावी. संबंधित रकाना कोरा ठेवल्यास किंवा नुसती रेघ मारल्यास असा नमुना स्वीकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

7. नियुक्तीसंदर्भातील पुढील सर्व पत्रव्यवहार उपरोक्त परि. 1 मध्ये नमूद प्राधिकाऱ्यांकडेच करण्यात यावा.

आपला विश्वासू ,

(रा. ह. झटके)
अवर सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,नवी
मुंबई